# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

फोननं.२४०१०४३७/२४०२०७८१
फॅक्सनं.२४०२४०६८
**Website:http: // mpcb.gov.in**
**E-mail:enquiry@mpcb.gov.in**

कल्पतरु पाईट, २/३/४ था माळा
सिनेट प्लॅनेट समोर,
सायन सर्कल, सायन (पूर्व),
मुंबई-४०० ००२

**जा.क्र.मप्रनि/कार्यालयीन आदेश/स.स.(तां)/ब-** १४६५ **दिनांक:** १९/०४/२०१८

**कार्यालयीन आदेश क्र.** ३० **/२०१८**

**विषय: महाराष्ट्र राज्यातील उद्योगांची तपासणी करणेसाठी भरारी पथकाची स्थापना**
संदर्भ: मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. ३०/२०१६ दि. ०९/५/२०१६

महाराष्ट्र राज्यात जल, हवा, ध्वनी, नागरी घनकचरा, प्लास्टीक कचरा, घातक घनकचरा यामुळे होणा-या प्रदुषणाबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारी, त्यानुषंगाने वाढत्या माहितीचे अधिकाराचे अर्ज, जनहित याचिका व मा. उच्च न्यायालय व राष्ट्रीय हरित लवाद यांचेकडे दाखल होणारे खटले, या अनुषंगाने म.प्र. नि. मंडळाकडून उपरोक्त संदर्भांकित आदेशान्वये भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली होती. सदरील भरारी पथकाची कालमर्यादा ०६ महिन्याची होती.

महाराष्ट्र राज्यातील प्रदुषणाबाबत विधिमंडळामध्ये प्रश्न, लक्षवेदी व चर्चा होऊन राज्यातील प्रदुषणावर आळा घालण्यासाठी मा. मंत्री पर्यावरण यांनी विधीमंडळास महाराष्ट्र राज्यात भरारी पथकाची स्थापना करुन प्रदुषित उद्योगांची तपासणी करण्याचे अश्वासित केले होते त्याअनुषंगाने राज्यातील उद्योगांची तपासणी करणेकरिता भरारी पथकाची स्थापना खालील मार्गदर्शक तत्वांच्या आधिन राहून करण्यात येत आहे.

**मार्गदर्शक तत्वे:**

अ) भरारी पथकाची स्थापना महाराष्ट्र राज्यातील सर्व उद्योगांसाठी राहिल व या पथकाची कालमर्यादा ०३ महिन्यापर्यंत राहिल

आ) भरारी पथक सदस्य सचिव/ अध्यक्ष म. प्र. नि. मंडळ यांनी जारी केलेल्या गोपनिय निर्देशावर कार्य करेल.

इ) भरारी पथकाकडून तपासणी झाल्यानंतर सविस्तर अहवाल पथक प्रमुखामार्फत तात्काळ सादर करण्याचा आहे व पथक प्रमुखाने गोपनियरित्या सदरचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे ०७ दिवसाचे आत सादर करण्याचा आहे.

ई) पथक प्रमुख यांनी सदस्य सचिव यांचे निर्देशानुसार कृती आराखडा तयार करावयाचा आहे.

उ) भरारी पथकासाठी लागणारी वाहने, उपकरणे, कर्मचारी मंडळाच्या प्रचलित नियमाच्या आधारे भाडे तत्वावर घेऊ शकतील. त्याचबरोबर, स्थानिक कार्यालयातील कर्मचा-यांची आवश्यकता भासल्यास मदतीसाठी कर्मचारी/अधिकारी यांचा उपयोग करता येईल

भरारी पथकाची रचना

| अ. नं. | सदस्याचे नांव | |
|---|---|---|
| ०१ | संबधित विभाग प्रमुख (सह-संचालक(हप्रनि/जप्रनि)/सहाय्यक सचिव (तां)/प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय) | पथक प्रमुख |
| ०२ | श्री. सुजित ढोलम, उप-प्रादेशिक अधिकारी कल्याण-३ | सदस्य |
| ०३ | श्री. सागर किल्लेदार, उप-प्रादेशिक अधिकारी ठाणे-२ | सदस्य |
| ०४ | श्री. सचिन आडकर, उप-प्रादेशिक अधिकारी, रायगड-१ | सदस्य |
| ०५ | श्री. कार्तिक लंगोटे / श्री. मिलींद ठाकूर, क्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ०६ | श्री. सुधिर भताणे क्षेत्र अधिकारी | सदस्य |
| ०७ | श्री. गजानन पवार, क्षेत्र अधिकारी | सदस्य |

भरारी पथकाची कालमर्यादा ०३ महिन्याचीच राहिल. परंतु आवश्यकता भासल्यास कार्यकाळ वाढविण्यात येईल.

सदरील आदेश तात्काळ अमलात येत आहेत.

(डॉ. पी. अनूबलगन)
सदस्य सचिव

प्रत माहितीस्तव सादर:
मा. अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई

प्रत:
वरील सर्व पथक सदस्य

१) श्री. सुजित ढोलम, उप-प्रादेशिक अधिकारी कल्याण-३
२) श्री. सागर किल्लेदार, उप-प्रादेशिक अधिकारी ठाणे-२
३) श्री. सचिन आडकर, उप-प्रादेशिक अधिकारी, रायगड-१
४) श्री. कार्तिक लंगोटे क्षेत्र अधिकारी
५) श्री. सुधिर भताणे क्षेत्र अधिकारी
६) श्री. मिलींद ठाकूर, क्षेत्र अधिकारी
७) श्री. गजानन पवार, क्षेत्र अधिकारी